## सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ०२ याची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
नांव - दिपक दिनकर चोखंडे,
वय - २९ वर्षे, व्यवसाय – शेती,
राहणार – बेलाड, ता.मलकापुर, जि.बुलडाणा.

**सरतपास- सरकारी अभियोक्ता श्री.के.व्ही.गारमोडे यांचेमार्फत शपथेवर सुरु...**

मी आरोपींना ओळखतो. घटना कधी, कोठे व केव्हा घडली, हे आज मला आठवत नाही. घटनेचे वेळी माझी आरोपींसोबत बोलचाल झाली होती. या व्यतिरिक्त काही झाले नव्हते.

२. असे घडले नव्हते की, घटनेचे वेळी आरोपींनी मला लाकडी टेंम्प्याने व लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली होती.

**(साक्षीदार हा अभियोगपक्षाला सहकार्य करीत नसल्यामुळे अभियोगपक्षाच्या तोंडी विनंतीवरुन त्याला सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी भारतीय साक्ष अधिनियम २०२३ चे कलम १५७ नुसार देण्यात येत आहे.)**

३. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०५/०९/२०२० रोजी रात्री अंदाजे ०८.३० वाजताचे दरम्यान मी बेलाड बस स्टॅँड येथील संभारे यांचे हॉटेलसमोर उभा होतो, त्यावेळी आरोपी क्र.०१ व ०२ माझेकडे आले, आरोपी क्र.०१ ने तु माझे नाव पोलीसांना सांगीतले होते, असे मला म्हणून चापटा-बुक्क्यांना मारहाण करण्यास सुरवात केली, त्यावेळी मी विरोध केला असता, आरोपी क्र.०२ ने माझी गच्ची पकडुन माझे नाकावर बुक्का मारला, त्यानंतर मी खाली पडलो असता आरोपी क्र.०२ ने मला लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली, आरोपी क्र.०३ ने लाकडी टेंम्प्याने माझे कानावर व हातावर मारहाण केली, त्यामुळे माझे कानाला जखम होवुन तेथून रक्त निघाले होते, सर्व आरोपींनी मला शिवीगाळ केली होती, आरोपी क्र.०२ ने मला जिवाने मारून टाकण्याची धमकी दिली होती, हे मला आज आठवत नाही की, वर नमुद घटनेचे अंनुषंगाने मी पोलीस स्टेशन, मलकापुर शहर येथे रिपोर्ट दिला होता किंवा कसे.

नि.फौ.ख क्र.२७/२०२१
सरकार -वि- योगेश व इतर
निशाणी क्र.४३

४. आता मला दिनांक ०५/०९/२०२० रोजीचा रिपोर्ट व त्यावरील सही दाखविण्यात आली. त्यावरील सही माझीच आहे. हे म्हणणे खरे नाही की, रिपोर्ट मधील मजकुर मी सांगीतल्याप्रमाणेच पोलीसांनी लिहला होता, तो बरोबर आहे, आरोपींनीमला मारहाण केल्यामुळे पोलीसांनी मला वैद्यकीय उपचाराकरीता दवाखान्यामध्ये पाठविला होता, मी सांगितल्याप्रमाणे पोलीसांनी माझे बयाण नोंदविले होते.

५. आता मला मी दिलेल्या तोंडी रिपोर्ट व बयाणातील अधोरेखांकीत **भाग-ब व भाग-क** मधील मजकुर वाचुन दाखवण्यात आला. तो मी पोलीसांना रिपोर्ट व माझा जबाब देते वेळी सांगितला नव्हता. तो पोलीसांनी रिपोर्ट व माझे जबाबामध्ये का नमुद केला, याचे कारण मी सांगु शकत नाही.

६. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रस्तुतचे प्रकरण आरोपींसोबत न्यायलयाबाहेर मिटविले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला प्रस्तुतची केस चालवायची नाही, माझी केसमध्ये इतर साक्षीदार तपासण्याची इच्छा नाही, माझी आरोपींविरूध्द तक्रार नाही. हे म्हणणे खरे नाही की, वर नमुद बाबींमुळे आरोपींना वाचविण्याकरिता मी आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

**सरतपासणी पुर्ण.**

**उलटतपास- आरोपींतर्फे विधीज्ञ श्री.व्ही.जी.इंगळे यांनी नाकारला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2026.03.16 17:49:10 +0530

**(सुनिल स. महाले)**
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी
मलकापूर.

दिनांक : १६.०३.२०२६